सं.फौ.ख.क्र.६१/२०२५
शासन वि. राजकुमार
नि.क्र.१३

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१**

नावः सुरेश हेमंत राजगडे,

वयः ३७ वर्ष, धंदाः दुय्यम निरीक्षक रा.उ.शु.ड विभाग, पारशिवनी,

पत्ताः रा.उ.शु. ड विभाग पारशिवणी, जि. नागपूर,

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र.१ याचा सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.व्ही.तलमले यांच्यामार्फत शपथेवर सुरुः**

**१.** मी दि. १९/१०/२०२४ रोजी रा.उ.शु.ड विभाग पारशिवनी येथे दुय्यम निरीक्षक पदावर कार्यरत होतो. त्या रोजी खबर मिळाली की आरोपी हा त्याच्या राहत्या घरी तामसावाडी सिंगोरी येथे अवैध्यरित्या दारु विक्री करीत आहे. त्यावरुन दोन पंचाना कार्यालयात बोलावून घेतले. दोन पंच, जवान व मी तामसवाडी सिंगोरी येथे आरोपीच्या घरी गेलो. आरोपी तेथे बसलेला दिसला. आरोपीच्या घराची झडती घेतली असता पलंगाच्या खाली देशी दारु भिंगरीच्या १३ निपा १८० मि.ली. क्षमतेच्या मिळून आले. आरोपीला परवाना असल्याबद्दल विचारले असता परवाना नसल्याचे सांगितले. पंचासमक्ष मुद्देमाला जप्त केला. दोन बॉटल नमूना म्हणून वेगळ्या सिल केल्या. जप्त नमूना रासायनिक परिक्षणाकरीता पाठविला. तपासाअंती दोषारोपपत्र दाखल केले. घटनेची फिर्याद मी नोंदविली. घटनास्थळ पंचनामा जवान यांनी तयार केला होता. त्यावर दोन पंच, आरोपी व माझी सही आहे. झडती जप्ती पंचनामा तयार केला. आता मला सदर पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे त्यास **नि. क्र. १८** देण्यात येते. आरोपीची चेहरापट्टी तयार केली. आता मला चेहरापट्टी दाखविण्यात आली त्यावर माझी सही आहे त्यास **नि. क्र. १९** देण्यात येते. आरोपीला सूचनापत्र दिले. आता मला सूचनापत्रची प्रत दाखविण्यात आली त्यावर माझी सही आहे त्यास **नि. क्र. २०** देण्यात येते. आरोपीचे घर सिंगोरी गावी होते. मी

आरोपीस ओळखतो. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण

**आरोपीतर्फे श्रीमती व्ही. टी. चौधरी वकील मॅडम यांचेमार्फत उलटतपास सुरु.**

२. हे म्हणणे खरे आहे की, दि. १९/१०/२०२४ रोजी मी कर्तव्यावर होतो याबाबत हजेरीपटाचा दस्त अभिलेखावर नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या घराचे दस्त प्राप्त केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या घरी गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या घरुन कोणतीही दारु जप्ती केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, रासायनीक परिक्षणाकरिता वेगळी काढली नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोटा पुर्ण करण्याकरिता खोटी केस तयार केली.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.11.12 17:23:38 +0530

(**जी.ओ. वानखडे**)
न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

**समक्ष**

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.11.12 17:23:43 +0530

(**जी.ओ. वानखडे**)
न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

दिनांकः १२/११/२०२५